# भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/९८५/२०२५ दि. २३/०८/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, भिवंडी** शहर हे गुजरात कडून मुंबईकडे व मुंबईकडून परत गुजरातकडे त्याचप्रमाणे गुजरातकडून नाशिककडे व नाशिककडून गुजरातकडे जाणाऱ्या मार्गावरील एक शहर असल्याने भिवंडी शहरातून मोठया प्रमाणावर जड – अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते सदर वाहतूक संक्रमण प्रकारची (Transit Traffic) आहे.

**ज्याअर्थी,** भिवंडी शहरामध्ये पूर्वीपासून मोठा वस्त्रोदयोग असल्याने त्याच्याशी पूरक लूम, डाईंग, सायझींग असे कारखाने मोठया प्रमाणात आहेत. तसेच भिवंडी शहरामध्ये प्लास्टिक मोती बनवण्याचा उदयोग मोठया प्रमाणात आहे. भिवंडी शहर हे मुंबई महानगर प्रदेशाचे प्रवेशद्वार असल्याने भिवंडी हे लॉजिस्टीक पार्कचे हब म्हणूनसुद्धा ओळखले जाते. त्यामुळे भिवंडी शहरात मोठया प्रमाणात जड अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. सदर वाहतूक भिवंडी शहरातून सुरू होणारी व संपणारी या प्रकारची असते.

**ज्याअर्थी,** भिवंडी महानगराची लोकसंख्या १३,००,००० जवळपास पोहोचलेली असून भिवंडी शहरात एकूण सर्व प्रकारची वाहने अंदाजे मिळून ४,५१,६८३ वाहने आहेत. या व्यतिरिक्त भिवंडी शहर हे औदयोगिक शहर असल्याने येथे बाहेरून येणाऱ्या वाहनांची संख्यादेखील मोठी आहे.

**ज्याअर्थी,** भिवंडी शहरात वरील दोन्ही प्रकारच्या माल वाहतुकीच्या वाहनांच्या मार्गावर असणारे शासकीय कार्यालये, बाजारपेठा, बॅका, दवाखाने, शाळा, महाविदयालय असून शासकीय कर्मचारी दैनंदिन व्यवहाराकरीता येणारे जाणारे नागरिक, दवाखान्यात दवाउपचाराकरीता येणारे रूग्ण, तसेच महाविदयालयात येणारे–जाणारे विदयार्थ्यांची गर्दी असते. त्यामुळे सदर मार्गावर वाहतूक कोंडी होवून सामान्य नागरिकांना मनस्ताप व असुविधा होते. तसेच या व्यवसायिक वाहनांमुळे छोटे मोठे अपघात, प्राणांतिक अपघात तसेच प्राणहानी सुद्धा झालेली आहे. त्यामुळे भिवंडी शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) भिवंडी शहरात गुजरात वाडा कडुन येणाऱ्या व नाशिक मुंबई अंजूरफाटा कडे जाणाऱ्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना **वंजारपट्टी नाका उड्डाणपूलावरून भिवंडी शहरात प्रवेश करण्यास 'कायमस्वरूपी प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदर अवजड वाहने वंजारपट्टी पूलावरून डावीकडे वळण घेवून चाविंद्रा मार्गे वडपे येथुन मुंबई नाशिक महामार्गावरून इच्छीत स्थळी जातील.

**ब)** वसई अंजूरफाटाकडे जाणारी वाहने चाविंद्रा येथून नाशिक मुंबई महामार्गावरून मानकोली मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण तसेच मुंबई कडून वाडा गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना रांजनोली नाका येथे **'कायमस्वरूपी प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने रांजनोली नाका कडून मुंबई नाशिक महामार्गावरून वडपे येथून डावीकडे वळण घेवून चाविंद्रा वंजारपट्टी ब्रिज मार्गे वाडा गुजरातकडे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) अंजुरफाटा मार्गे वाडा गुजरात अथवा नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना **अंजुरफाटा** येथे **'कायमस्वरूपी प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदर वाहने अंजुरफाटा वरून मानकोली मार्गे मुंबई नाशिक महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**ब)** वाडा गुजरात कडे जाणारी वाहने वडपे – चाविंद्रा – वंजारपट्टी उड्डाणपूल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) तळवली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या (सहा चाकी वाहनांवरील) सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना भिवंडी शहरात **'कायमस्वरूपी प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने तळवली नाका कडून खोणीगाव – पारोळ फाटा – वंजारपट्टी उड्डाणपूलावरून चाविंद्रा मार्गे नाशिक हायवेने इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचनेचा भंग करणाऱ्या मोटर वाहन चालकाविरूध्द मोटर वाहन कायदा १९८८ कलम १७९(१) अन्वये कारवाई करण्यात येईल.

सदर अधिसूचना दि. २३/०८/२०२५ रोजीपासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १,२,३.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/भिवंडी/कल्याण डोंबिवली.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

संबंधित सपोआ, वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.